# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र. २/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १ फेब्रुवारी, २०१७

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
(मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर,
धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम, नागपूर, भंडारा व गोंदिया वगळून)

महानगरपालिका आयुक्त,
बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड,
सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर.

विषय :- जिल्हापरिषद, पंचायत समित्या व महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका - २०१७
उमेदवारांच्या शपथपत्राचा गोषवारा मतदान केंद्राबाहेर लावण्याबाबत.

महोदय / महोदया,

राज्यातील २५ जिल्हापरिषदा, २८३ पंचायत समित्या व १० महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित झालेला आहे. या निवडणुकांमध्ये उमेदवाराने नामनिर्देशन पत्रासोबत सादर केलेल्या शपथपत्राचा गोषवारा मतदान केंद्राबाहेर स्पष्टपणे वाचता येईल अशा आकाराच्या फ्लेक्सच्या स्वरुपात लावण्याबाबत आयोगाकडून यापूर्वीच सूचना देण्यात आलेल्या आहेत. यासंदर्भात स्पष्ट करण्यात येते की, सदर फ्लेक्सचा आकार किमान ३ फूट x ४ फूट इतका असावा व तो सहजपणे दिसेल अशारितीने लावण्यात यावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत- १) सर्व विभागीय आयुक्त
२) का.७, राज्य निवडणूक आयोग.
३) निवड नस्ती.

D:\MAHALE\Wagale\फ्लेक्सच्या आकाराबाबत.docx/महाले

२।२।१७